# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापिठ,अकोला.
## अर्थ प्रशासन विभाग.
### पी.ओ.कृषिनगर, अकोला-४४४ १०४(महाराष्ट्र)

सौ. विद्या सु. पवार
नियंत्रक
ई-मेल :comptroller@pdkv.ac.in
दुरध्वनी:- ०७२४२२५८४६९
फॅक्स :- ०७२४-२२५८८७३


जा.क्र.अप्रवि/अंलेप/ ६८४ /२०१७-१८

दिनांक: ९ /०८/२०१८

प्रति,

.............................................

.............................................

.............................................

डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
अकोला/ नागपूर

विषय : मा. उच्च न्यायालय खंडपीठ, नागपूर यांच्या निर्णयानुसार वेतन व निवृत्ती वेतन मध्ये झालेल्या अतिप्रदानाच्या वसूली बाबत .

संदर्भ : १. मा. उच्च न्यायालय खंडपीठ, नागपूर दि.१९ / २०.०७.२०११ याची क्र.४०७/२०१०
२. विद्यापीठ आदेश क्र.बीडीए/का.ब.प./क.स.स./२००९, दि.१०.०२.२०१२
३.मा. कुलसचिव, डॉ. पं. दे.कृ. वि., अकोला यांचे पत्र क्र.बीजीए/०२/१५५/२०१०, दि.१६/०४/२०१६.
४. या कार्यालयाचे पत्र क्र.अप्रवि/अलेप/१२१/२०१५-१६, दि.०४/०५/२०१६.
५. या कार्यालयाचे पत्र क्र.अप्रवि/अलेप/२६२७/२०१७-१८, दि.२३/०३/२०१८.

उपरोक्त संदर्भांकीत विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, मा. उच्च न्यायालय खंडपीठ, नागपूर येथे दाखल याचीका क्र.४०७/२०१० नुसार १९/२०.०७.२०११ च्या निर्णयान्वये याचीका कर्ते व त्या आधारे घेतलेल्या संबंधीत अधिकारी कर्मचारी यांच्याकडून वेतन श्रेणी ६५००-१०५०० ऐवजी वरिष्ठ वेतन श्रेणी ७४५०-११५०० घेण्यात आली त्यामुळे वेतन व निवृत्ती वेतनामध्ये झालेल्या अतिप्रदानाविषयी महाराष्ट्र शासन कृषि व पदुम विभागाचे पत्र क्र.मकृवि-११०८/१४७६/प्र.क्र.१९५/६-अे, दि.३०.०६.२०१० नुसार व मा. उच्च न्यायालय खंडपीठ, नागपूर यांनी दिलेल्या निर्णय दि.१९ /२० .७.२०११ च्या निर्णयान्वये वेतन व निवृत्ती वेतन मध्ये झालेल्या अतिप्रदान रकमेची वसुली करणेबाबत आदेशीत केले आहे.

तरी आपणास याद्वारे पुन्हा सुचीत करण्यात येते की, आपल्या विभागात/ आस्थापनेवर कार्यरत किंवा सेवानिवृत्त झालेले **वरिष्ठ संशोधन सहायक** ज्यांना रु.६५००-१०५०० ऐवजी वरिष्ठ वेतन श्रेणी ७४५०-११५०० वेतनश्रेणी वरिष्ठ पदावर ५ वर्ष पूर्ण न होता प्रदान करण्यात आली अशा प्रकरणी वेतन व निवृत्ती वेतनामध्ये झालेल्या अतिप्रदानाविषयी वसुली तसेच काही प्रकरणी कालबध्द पदोन्नती व तसेच कनिष्ठ कर्मचा-याचे वेतन वाढवून देण्या प्रकरणी मागील वेतन आयोगातील वरिष्ठ वेतन श्रेणी ५ वर्ष पूर्ण होण्यापूर्वीच मंजूर केली आहे अशा प्रकरणी सुध्दा वसुलीची कार्यवाही करावी व सेवापुस्तक पडताळणी करुन पुन्हा वेतन निश्चिती करुन त्यांना अतिप्रदान झालेल्या अतिप्रदानाची वसुली आपल्या स्तरावर ते निवृत्त होण्यापूर्वी व्हावी याची दक्षता घ्यावी.

या संबंधीत असे निर्दशनास आलेले आहे की, काही कार्यालय / विभागाकडून संबंधित अधिकारी / कर्मचा-यांची वसुली त्याच्या सेवाकाळात न करता सदर वसुली निवृत्तीवेतन विषयक लाभातून प्रस्तावित करतात. या संदर्भात सदर अधिकारी / कर्मचारी न्यायालय/मा. सर्वोच्च न्यायालयात प्रकरणे दाखल करुन न्यायालयीन स्थगनादेश प्राप्त करीत आहेत त्यामुळे अधिकारी / कर्मचारी यांच्या निवृत्तीवेतनविषयक लाभातून वसुली प्रस्तावित न करता त्यांच्या सेवाकाळातच वसुली करण्यात यावी.

यास्तव आपणास कळविण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी वसुली त्यांच्या सेवाकाळातच करण्यात यावी, वसुली न झाल्यास संबंधीत विभागप्रमुख व आहरण व संवितरण अधिकारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात येईल

तरी वरील प्रकरणी कार्यालया मार्फत वेळीच कार्यवाही करण्यात यावी जेणेकरुन शासन व विद्यापीठास वसुली करणे शक्य होईल.

नियंत्रक
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
अकोला

प्रतिलिपी :

१) कुलगुरु यांचे तांत्रिक सचिव,डॉ. पं.दे.क.वि.,अकोला यांना मा.कुलगुरु यांच्या माहितीस्तव सादर.
२) कुलसचिव, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांना माहितीस्तव सादर.
३) वेतन व लेखाधिकारी,डॉ. पं.दे.क.वि.,अकोला / नागपूर यांना माहितीकरीता.
४) प्रभारी अधिकारी, संगणक प्रणाली कक्ष, डॉ. पं.दे.क.वि.,अकोला यांना विद्यापीठ संकेत स्थळावर प्रसारणाकरीता.

नियंत्रक